L. A. BILL No. LI 2026.

A BILL

TO PROVIDE FOR REGISTRATION, REGULATION AND INSPECTION OF CLINICAL ESTABLISHMENTS IN THE STATE OF MAHARASHTRA, TO PRESCRIBE MINIMUM STANDARDS OF FACILITIES AND SERVICES WHICH MAY BE PROVIDED BY SUCH ESTABLISHMENTS ; AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.

सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५१.

महाराष्ट्र राज्यातील चिकित्सा आस्थापनांची नोंदणी, विनियमन व तपासणी करण्यासाठी, अशा आस्थापनांद्वारे ज्या सुविधा व सेवा पुरविण्यात येतील त्यांची किमान मानके विहित करण्याकरिता; आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्यासाठी विधेयक.

ज्याअर्थी, राज्यातील चिकित्सा आस्थापनांची नोंदणी, विनियमन व तपासणी करण्यासाठी, अशा आस्थापनांद्वारे ज्या सुविधा व सेवा पुरविण्यात येतील त्यांची किमान मानके विहित करण्याकरिता तरतूद करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहेः-

प्रकरण एक

प्राथमिक

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र चिकित्सा आस्थापना (नोंदणी व विनियमन) अधिनियम, २०२६, असे म्हणावे.

(२) तो, शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल; आणि मान्यताप्राप्त वैद्यक पद्धतींच्या वेगवेगळ्या प्रकारांकरिता चिकित्सा आस्थापनांच्या वेगवेगळ्या प्रवर्गांसाठी वेगवेगळे दिनांक नियत करण्यात येतील.

व्याख्या.

२. या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर,—

(क) "प्राधिकरण" याचा अर्थ, कलम ८ अन्वये घटित केलेले चिकित्सा नोंदणी प्राधिकरण, असा आहे;

(ख) "अपील प्राधिकरण" याचा अर्थ, कलम ३५ अन्वये घटित केलेले अपील प्राधिकरण, असा आहे;

(ग) "प्रमाणपत्र" याचा अर्थ,कलम २९ अन्वये दिलेले नोंदणी प्रमाणपत्र, असा आहे;

(घ) "चिकित्सालय" याचा अर्थ, जेथे रुग्णांना रुग्णालयात दाखल करून घेण्याची किंवा निरीक्षण खाटा असताना किंवा नसताना, रात्रभर थांबण्याची कोणतीही तरतूद नसताना, औषधे तयार करण्याच्या, साठवणूक करण्याच्या व औषध तयार करून देण्याच्या सुविधा असलेल्या किंवा नसलेल्या, कोणत्याही मान्यताप्राप्त वैद्यक पद्धतीत आजार, इजा, व्यंग, विकृती किंवा गर्भधारणा यांचे रोगनिदान, उपचार किंवा देखभाल करण्यासाठी बाह्य रुग्ण सेवा पुरविल्या जातात अशी एकल वैद्यकीय व्यवसायीकडून किंवा आरोग्य व्यवसायीकडून किंवा त्यांच्या गटाद्वारे चालविण्यात येणारी आस्थापना, असा आहे आणि त्यात, दवाखान्याचा समावेश होतो;

(ङ) "चिकित्सा आस्थापना" याचा अर्थ, —

(एक) जेथे आजार, इजा, व्यंग, विकृती किंवा गर्भधारणा यांचे कोणत्याही मान्यताप्राप्त वैद्यक पद्धतीने आवश्यक रोगनिदान, उपचार किंवा देखभाल करण्यासाठी सेवा, सुविधा दिल्या जातात अशी, एकल डॉक्टरने, कोणत्याही व्यक्तीने किंवा व्यक्तींच्या निकायाने, विश्वस्तसंस्थेने,- मग ती सार्वजनिक असो किंवा खाजगी, - मग ती विधिसंस्थापित असो किंवा नसो,- स्थापन केलेले व प्रशासित केलेले किंवा चालविलेले रुग्णालय, प्रसूतिगृह, शुश्रूषालय, दिवसोपचार केंद्र, दवाखाना, चिकित्सालय, आरोग्यधाम किंवा संस्था, - मग ती कोणत्याही नावाने संबोधण्यात येवो, असा आहे; किंवा

(दोन) जेथे रोगनिदानाच्या किंवा उपचाराच्या संबंधात, प्रयोगशाळेच्या किंवा इतर वैद्यकीय उपकरणाच्या साहाय्याने विकृतिशास्त्रीय, जीवाणूशास्त्रीय, अनुवंशशास्त्रीय, किरणोपयोजन शास्त्रीय, रासायनिक, जीवशास्त्रीय तपासण्या केल्या जातात अथवा इतर निदानोपयोगी किंवा तपासणी सेवा दिल्या जातात, असे एकल डॉक्टरने, कोणत्याही व्यक्तीने किंवा व्यक्तींच्या निकायाने, विश्वस्तसंस्थेने,- मग ती सार्वजनिक असो किंवा खाजगी,- मग ती विधिसंस्थापित असो किंवा नसो,- एक स्वतंत्र संस्था म्हणून किंवा पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या आस्थापनेचा एक भाग म्हणून स्थापन केलेले व प्रशासित केलेले किंवा चालविलेले ठिकाण, असा आहे; परंतु त्यामध्ये,—

(क) सशस्त्र दले ;

२०१७ चा १०. (ख) मानसिक आरोग्य अधिनियम, २०१७ याच्या अर्थांतर्गत, मानसिक आजारांनी ग्रस्त असणारे वेडे किंवा रुग्ण यांच्यासाठी असलेले कोणतेही उपचार गृह ; आणि ;

(ग) केंद्र सरकार, राज्य शासन, स्थानिक स्वराज्य संस्था, स्थानिक शासकीय प्राधिकरण किंवा शासकीय सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम,

यांची मालकी असलेल्या, नियंत्रण असलेल्या किंवा यांचे व्यवस्थापन असलेल्या चिकित्सा आस्थापनांचा समावेश होणार नाही.

१९५० चा ४६. **स्पष्टीकरण.—** या खंडाच्या प्रयोजनार्थ, "सशस्त्र दल" याचा अर्थ, भूसेना अधिनियम, १९५०,
१९५० चा ४५. वायुसेना अधिनियम, १९५०, आणि नौसना अधिनियम, १९५७ या अन्वये घटित केलेली दले, असा आहे ;
१९५७ चा ६२.

(च) "परिषद" याचा अर्थ, कलम ३ अन्वये स्थापन केलेली महाराष्ट्र राज्य चिकित्सा आस्थापना परिषद, असा आहे ;

(छ) "दिवसोपचार केंद्र" याचा अर्थ, जेथे कोणत्याही मान्यताप्राप्त वैद्यक पद्धतीत, स्थानिक, प्रादेशिक किंवा सर्वसाधारण भूल देऊन किंवा भूल न देता किंवा शुद्धीत असताना वैद्यकीय, दंत वैद्यकीय किंवा शस्त्रक्रिया प्रक्रिया, रोगनिदानात्मक किंवा उपचारात्मक प्रक्रिया केल्या जातात, आणि रात्रभर थांबण्याची तरतूद नसताना, जेथे रुग्णाला दाखल करण्यात येते आणि त्याच कॅलेंडर दिवशी (२४ तासांपेक्षा जास्त नसलेल्या) रुग्णालयातून सोडले जाते अशी आस्थापना, असा आहे;

(ज) "आपत्कालीन वैद्यकीय स्थिती" याचा अर्थ, ज्या स्थितीत तात्काळ वैद्यकीय उपचार मिळू शकले नाहीत तर, त्याचा परिणाम पुढीलपैकी कोणत्याही गोष्टीत होऊ शकतो अशा स्वरूपाची पुरेशा तीव्र लक्षणांद्वारे (गंभीर वेदनांसह) प्रकट होणारी वैद्यकीय स्थिती, असा आहे :—

(एक) एखाद्या व्यक्तीच्या आरोग्याला किंवा एखाद्या गरोदर महिलेच्या बाबतीत, त्या महिलेच्या किंवा तिच्या गर्भस्थ बाळाच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण होणे ; किंवा

(दोन) शारीरिक कार्यांमध्ये गंभीर बिघाड होणे ; किंवा

(तीन) शरीरातील कोणत्याही अवयवाच्या किंवा भागाच्या कार्यात गंभीर दुष्क्रियता निर्माण होणे ;

(झ) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे;

(ञ) "रुग्णालय" याचा अर्थ, जिच्यामध्ये चोवीस तासांपेक्षा अधिक काळ रुग्णांना आंतररुग्ण म्हणून दाखल करून घेण्याची सुविधा आहे आणि जी, शस्त्रक्रियेसह किंवा त्याविना, प्रसूती करण्याच्या सुविधेसह किंवा त्याविना, अतिदक्षता देखभाल व वैद्यकीय देखभाल सेवा पुरविते; जिच्यामध्ये बाह्य-रुग्ण सुविधा आणि कोणत्याही मान्यताप्राप्त वैद्यक पद्धतीमधील रोगनिदान व उपचारांसाठी आवश्यक असू शकतील अशा इतर सुविधा आहेत, जिच्याकडे संघटित वैद्यकीय व इतर व्यावसायिक कर्मचारीवर्ग आहे, जी दिवसाचे चोवीस तास व आठवड्याचे सातही दिवस वैद्यकीय, शुश्रूषा व तत्संबंधित किंवा संलग्न सेवा पुरविते, जी रोग, इजा व अनुवंशशास्त्रीय विकृती यांमुळे उद्भवणाऱ्या तीव्र व जुनाट स्थितींना प्रतिसाद म्हणून रोगनिदानात्मक, उपचारात्मक सेवांचा किंवा पुनर्वसन सेवांचा वापर करून तीव्र, आजारातून बरे होण्याच्या व बरे न होण्याच्या टप्प्यातील देखभालीची विविध प्रकारची सेवा पुरविते; आणि जी, संशोधन, शिक्षण व व्यवस्थापन करण्यासाठी आवश्यक माहिती निर्माण करते, अशी आस्थापना, असा आहे ;

(ट) “आंतर-रुग्ण” याचा अर्थ, सर्व प्रकारच्या रुग्णालयीन खाटा असलेल्या अंतर्गत देखभाल सेवांसाठी रुग्णालयात दाखल केलेला किंवा रुग्णालयात उपचारासाठी भरती केलेला रुग्ण, असा आहे ;

(ठ) “प्रसूतीगृह” याचा अर्थ, जेथे गरोदर महिलांना किंवा प्रसूतीवेदना असलेल्या किंवा बाळाच्या जन्मानंतर तात्काळ महिलांना ठेवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या किंवा वापरण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही जागा असणाऱ्या आस्थापना, असा आहे ;

(ड) “वैद्यकीय प्रयोगशाळा” याचा अर्थ, जेथे मानवी शरीरातून काढलेले विविध नमुने किंवा पदार्थ नियमितपणे गोळा केले जातात किंवा सूक्ष्मजीवशास्त्रीय, रक्तद्रव्यशास्त्रीय, रासायनिक, रक्तशास्त्रीय, प्रतिक्षमताऔषधशास्त्रीय, प्रतिक्षमताशास्त्रीय, विषशास्त्रीय, पेशीजीनशास्त्रीय किंवा इतर तत्सम तंत्रे व उपकरणे वापरून परीक्षण केले जाते, जेथे अशा परीक्षणाचे निष्कर्ष काढले जातात, त्याचे विश्लेषण केले जाते आणि आरोग्य निर्धारण, संनियंत्रण, मूल्यमापन करण्याच्या प्रयोजनासाठी किंवा प्रतिबंधात्मक दृष्टीने, अहवाल दिले जातात अशी आस्थापना किंवा सुविधा, असा आहे ;

(ढ) “शुश्रूषालय” याचा अर्थ, कोणत्याही आजारपणाने, दुखापतीने किंवा विकलतेने ग्रस्त असलेल्या व्यक्तींना ठेवण्यासाठी आणि त्यांच्यावर निवासी स्वरूपात असू शकेल असा उपचार करण्यासाठी व शुश्रूषा करण्याकरिता वापरल्या जात असलेल्या किंवा वापरण्याचे उद्देशित असलेल्या, कोणत्याही जागा असणारी आस्थापना, असा आहे ;

स्पष्टीकरण.— या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, जेथे चिकित्सा आस्थापना स्वतःच्या मालकीची असेल किंवा नियंत्रणात असेल अथवा जी फ्रँचाइझी करारान्वये किंवा अन्यथा स्वतंत्रपणे चालवण्यात येत असेल, अशी प्रत्येक सुविधा, युनिट किंवा शाखा,— मग तिला कोणत्याही नावाने संबोधण्यात येवो,— या अधिनियमान्वये एक स्वतंत्र चिकित्सा आस्थापना म्हणून समजण्यात येईल ;

(ण) “बाह्य रुग्ण” याचा अर्थ, ज्याला आंतर रुग्णाप्रमाणे दाखल न करता किंवा रुग्णालयात भरती न करता आरोग्यसेवा पुरविण्यात येतात, असा रुग्ण, असा आहे ;

(त) “रुग्ण” याचा अर्थ, जी स्वतःहून दाखल होते किंवा तिला उपचारासाठी किंवा सल्ल्यासाठी किंवा अशा चिकित्सा आस्थापनेकडून दिल्या जाणाऱ्या कोणत्याही इतर सेवा घेण्यासाठी कोणत्याही चिकित्सा आस्थापनेत आणले जाते अशी कोणत्याही वयाची व्यक्ती, असा आहे ;

(थ) “विहित” याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

(द) “रेडिओ-निदान केंद्र” याचा अर्थ, जी, क्ष-किरण, पराध्वनीचित्रण (अल्ट्रासोनोग्राफी), सिटी स्कॅन, एम आर आय, पी ई टी स्कॅन, मॅम्मोग्राफी, टूडी इको, डेक्झा स्कॅन, इतर प्रतिमाकरण प्रकारदर्शकता, इत्यादी सेवांसह निदानात्मक प्रतिमाकरण सेवा पुरवते अशी कोणतीही चिकित्सा आस्थापना , असा आहे ;

(ध) “मान्यताप्राप्त वैद्यक पद्धती” याचा अर्थ, वैद्यकशास्त्राची विषमचिकित्सा, आयुर्वेद, समचिकित्सा, सिद्ध व युनानी पद्धती किंवा राज्य शासनाकडून किंवा केंद्र सरकारकडून मान्यता देण्यात येईल अशी इतर कोणतीही वैद्यक पद्धती, असा आहे;

(न) “नोंदवही” याचा अर्थ, या अधिनियमाच्या अनुक्रमे, कलमे ३६ व ३७ या अन्वये प्राधिकरणाने व परिषदेने ठेवलेली, नोंदणीकृत चिकित्सा आस्थापनांच्या संख्येचा अंतर्भाव असलेली नोंदवही, असा आहे ;

(प) “नोंदणी” याचा अर्थ, कलम ९ अन्वये नोंदणी करणे, असा आहे आणि नोंदणी किंवा नोंदणीकृत या शब्दप्रयोगाचा अन्वयार्थ त्यानुसार लावण्यात येईल ;

(फ) "नियम" याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेले नियम, असा आहे ;

(ब) "आरोग्यधाम" याचा अर्थ, संरचित उपचार पद्धतीद्वारे विशेष वैद्यकीय सेवा, विश्रांती, स्वच्छ हवा, पुरेसा पोषणआहार, आवश्यकतेनुसार विलगीकरण व सातत्यपूर्ण वैद्यकीय देखरेख आणि आंतर-रुग्ण म्हणून दाखल करून उपचार व आरोग्य लाभ पुरवून, दीर्घकालीन किंवा जुनाट आजारांच्या, विशेषतः क्षयरोगाच्या व इतर श्वसनविकारांच्या उपचारांसाठी, विनिर्दिष्ट केलेली आस्थापना किंवा वैद्यकीय सुविधा, असा आहे ;

(भ) "मानके" याचा अर्थ, या अधिनियमान्वये चिकित्सा आस्थापनांच्या नोंदणीसाठी कलम १० अन्वये शासनाने विहित केलेले विनिर्देश अथवा मापदंड, असा आहे ;

(म) "प्रकृती स्थिर असणे (त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह व सजातीय शब्दप्रयोगांसह)" याचा अर्थ, खंड (ज) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या आपत्कालीन वैद्यकीय स्थितीच्या बाबतीत, एखाद्या व्यक्तीला एखाद्या चिकित्सा आस्थापनेमधून हलविण्याच्या कालावधीत, त्याच्या परिणामी, तिची स्थिती खालावण्याची किंवा ती आणखी बिघडण्याची कोणतीही शक्यता नाही, या वाजवी वैद्यकीय संभाव्यतेसह आश्वासित करण्यासाठी त्या स्थितीत आवश्यक असेल असा वैद्यकीय औषधोपचार पुरविणे, असा आहे.

प्रकरण दोन

परिषद व चिकित्सा आस्थापना नोंदणी प्राधिकरण

महाराष्ट्र राज्य चिकित्सा आस्थापना परिषद.

३. (१) शासन, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, महाराष्ट्र राज्य चिकित्सा आस्थापना परिषद घटित करील.

(२) परिषद, पुढील सदस्यांची मिळून बनलेली असेल :—

(क) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री – जो पदसिद्ध, अध्यक्ष असेल ;

(ख) सचिव, सार्वजनिक आरोग्य – पदसिद्ध सदस्य ;

(ग) आयुक्त, आरोग्य सेवा – पदसिद्ध सदस्य ;

(घ) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन – पदसिद्ध सदस्य ;

(ङ) संचालक, आयुष (आयुर्वेद) – पदसिद्ध सदस्य ;

(च) संचालक, आरोग्य सेवा – पदसिद्ध सदस्य- सचिव ;

(छ) पुढील परिषदांमधून राज्य शासनाद्वारे नामनिर्देशित करावयाचे तीन प्रतिनिधीः—

(एक) महाराष्ट्र वैद्यकीय परिषद ;

(दोन) महाराष्ट्र राज्य दंतवैद्यक परिषद ;

(तीन) महाराष्ट्र परिचर्या परिषद ;

(चार) महाराष्ट्र राज्य औषधनिर्माण परिषद ;

(पाच) महाराष्ट्र राज्य संलग्न आरोग्यसेवा परिषद ;

(सहा) वैद्यकशास्त्राच्या आयुर्वेद, सिद्ध किंवा युनानी पद्धतींचे प्रतिनिधित्व करणारी महाराष्ट्र वैद्यकीय परिषद.

(३) परिषदेचा नामनिर्देशित सदस्य, तीन वर्षांच्या मुदतीकरिता पद धारण करील, परंतु, तो, तीन वर्षांच्या सलग मुदतीच्या कमाल आणखी एका मुदतीकरिता पुन्हा नामनिर्देशित करण्याकरिता पात्र असेलः

परंतु, नामनिर्देशित केलेली व्यक्ती, ज्या पदाच्या आधारे तिला परिषदेवर नामनिर्देशित केले होते किंवा निवडले होते त्या पदाची नियुक्ती ती जितक्या कालावधीसाठी धारण करील, अशा कालावधीसाठी पद धारण करील.

(४) परिषदेचे सदस्य, विहित करण्यात येईल असे भत्ते मिळण्यास हक्कदार असतील.

(५) परिषद, गणपूर्ती निश्चित करणारे व तिची स्वतःच्या कार्यपद्धतीचे आणि तिने करावयाचे सर्व कामकाज करण्याचे नियमन करणारे उपविधी, शासनाच्या पूर्व मान्यतेच्या अधीन राहून, करू शकेल.

(६) परिषद, तीन महिन्यांतून किमान एकदा बैठक घेईल.

(७) परिषद, विशिष्ट बाबींवर विचार करण्यासाठी, उप समित्यांची नियुक्ती करु शकेल आणि तिला योग्य वाटेल अशा, परिषदेचे सदस्य नसलेल्या व्यक्तींची,अशा उप समित्यांवर दोन वर्षांपेक्षा अधिक नसेल अशा कालावधीसाठी, नियुक्ती करू शकेल.

(८) परिषदे मध्ये कोणतेही रिक्त पद असले तरीही, तिला तिची कार्ये करता येतील.

(९) शासन, ते विहित करील अशा व्यक्तीची, परिषदेचा सचिव म्हणून नियुक्ती करील आणि त्यास आवश्यक वाटेल असा सचिवालयीन व इतर कर्मचारीवर्ग परिषदेला पुरवील.

सदस्य म्हणून नियुक्तीसाठी अनर्हता.

४. जर एखादी व्यक्ती,—

(क) राज्य शासनाच्या मते, नैतिक अधःपतनाचा अंतर्भाव असलेल्या एखाद्या अपराधाबद्दल दोषसिद्ध ठरविण्यात आली असेल; किंवा

(ख) अविमुक्त नादार झाली असेल ; किंवा

(ग) विकल मनाची असेल आणि सक्षम न्यायालयाने तिला तसे घोषित केले असेल ; किंवा

(घ) शासनाच्या सेवेतून किंवा शासनाची मालकी असलेल्या किंवा शासनाचे नियंत्रण असलेल्या महामंडळाच्या सेवेमधून तिला काढून टाकण्यात किंवा बडतर्फ करण्यात आले असेल ; किंवा

(ङ) शासनाच्या मते, सदस्य म्हणून तिची कार्ये पार पाडताना बाधा पोहोचण्याचा संभव असेल असे परिषदेतील वित्तीय किंवा अन्य हितसंबंध असतील तर, ती व्यक्ती, परिषदेची सदस्य म्हणून नियुक्त केली जाण्यास अनर्ह ठरेल.

परिषदेची कार्ये.

५. परिषद पुढील कार्ये पार पाडील :—

(क) चिकित्सा आस्थापनांची किमान मानके निर्धारित करणे आणि तिच्याकडून रुग्णांना पुरवल्या जाणाऱ्या सेवा विनिर्दिष्ट करणे ;

(ख) या अधिनियमाच्या तरतुदींची योग्य व प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे ;

(ग) चिकित्सा आस्थापनांच्या राज्य नोंदवह्यांचे संकलन करणे आणि त्या अद्ययावत ठेवणे ;

(घ) राज्यातील मानकांच्या अंमलबजावणीचा अहवाल दरवर्षी प्रसिद्ध करणे ; आणि

(ङ) शासनाकडून, वेळोवेळी, निर्धारित करण्यात येतील अशी इतर कोणतीही कार्ये पार पाडणे.

६. परिषदेस, या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींची अंमलबजावणी करताना, ती ज्या व्यक्तीचे किंवा संस्थेचे सहाय्य किंवा सल्ला घेऊ इच्छित असेल अशा कोणत्याही व्यक्तीस किंवा संस्थेस सहयोगी करता येईल.

सल्ला किंवा सहाय्य मागण्याचा अधिकार.

७. परिषद, विहित करण्यात येईल अशा कार्यपद्धतीनुसार चिकित्सा आस्थापनांची मानके निर्धारित करण्यासाठी आणि तिचे वर्गीकरण करण्यासाठी संमंत्रक प्रक्रियेचे अनुसरण करील.

परिषदेने समंत्रक प्रक्रिया अनुसरणे.

८. (१) शासन, चिकित्सा आस्थापनांची नोंदणी करण्यासाठी, अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्राकरिता, चिकित्सा आस्थापना नोंदणी प्राधिकरण या नावाने संबोधले जाणारे एक प्राधिकरण, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, घटित करील:

चिकित्सा आस्थापना नोंदणी प्राधिकरण.

परंतु, वेगवेगळ्या क्षेत्रांसाठी वेगवेगळी प्राधिकरणे घटित करता येतील.

(२) प्राधिकरण, अध्यक्ष, सदस्य-सचिव आणि विहित करण्यात येतील असे इतर सदस्य यांचे मिळून बनलेले असेल.

(३) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कलम १४ अन्वये चिकित्सा आस्थापनांच्या तात्पुरत्या नोंदणीच्या प्रयोजनांसाठी, चिकित्सा आस्थापना नोंदणी प्राधिकरणाचा सदस्य-सचिव, विहित करण्यात येईल अशा कार्यपद्धतीनुसार, प्राधिकरणाच्या अधिकारांचा वापर करील.

(४) प्राधिकरण, पुढील अधिकारांचा वापर करील:-

(क) त्याच्या अधिकारक्षेत्रातील चिकित्सा आस्थापनांची नोंदणी करणे, त्यांचे नूतनीकरण करणे, त्या निलंबित करणे आणि त्या रद्द करणे;

(ख) नोंदणीसाठी व नोंदणीच्या नूतनीकरणासाठी, विहित करण्यात येईल असे शुल्क आकारणे;

(ग) या अधिनियमान्वये तरतूद केल्याप्रमाणे द्रव्यदंड व शास्ती लादणे; आणि

(घ) विहित करण्यात येतील अशी इतर कार्ये पार पाडणे.

प्रकरण तीन

चिकित्सा आस्थापनांची नोंदणी व मानके

९. या अधिनियमाच्या तरतुदींनुसार चिकित्सा आस्थापनेची यथोचितरीत्या नोंदणी केल्याशिवाय, कोणतीही व्यक्ती, चिकित्सा आस्थापना चालवणार नाही.

चिकित्सा आस्थापनांची नोंदणी.

१०. (१) नोंदणीसाठी व ती पुढे चालू ठेवण्यासाठी, प्रत्येक चिकित्सा आस्थापना, पुढील शर्तींची पूर्तता करील :-

नोंदणीच्या शर्ती.

(एक) विहित करण्यात येतील अशा सुविधा व सेवा यांची मानके;

(दोन) चिकित्सा आस्थापनांसाठी विहित करण्यात येईल असा आवश्यक कर्मचारीवर्ग;

(तीन) अभिलेख ठेवण्यासाठी व तो कळविण्यासाठी विहित करण्यात येतील अशा तरतुदी;

(चार) विहित करण्यात येतील अशा अन्य शर्ती.

(२) चिकित्सा आस्थापना, चिकित्सा आस्थापनेत आलेल्या किंवा आणलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या आपत्कालीन वैद्यकीय स्थितीच्या स्थिरतेसाठी उपलब्ध असलेला कर्मचारीवर्ग व सुविधा यामधून कर्मचारी वर्ग व सुविधा आणि आवश्यक असेल अशी वैद्यकीय तपासणी व उपचार पुरवील.

(३) प्रत्येक चिकित्सा आस्थापना, रुग्णाच्या आर्थिक क्षमतेचा विचार न करता, आपत्कालीन रुग्णांवर प्राधान्याने उपचार करील आणि त्यांना उपलब्ध सुविधा व तज्ञ यानुसार मुलभूत जीवन रक्षक सहाय्य पुरवील, आणि त्यानंतर, अशा रुग्णाला, त्याच्या आजाराबाबतच्या वैद्यकीय संदर्भ टिप्पणीसह शक्य तितक्या लवकर, जवळच्या सुयोग्य संदर्भ रुग्णालयात पाठवील. आवश्यक सुवर्ण तास उपचार नियमावलीचे पालन करण्यात येईल.

दर व आवश्यक माहिती प्रदर्शित करणे.

११. (१) प्रत्येक चिकित्सा आस्थापना, तिच्या आवारातील एखाद्या ठळक जागी, -

(एक) तिच्या नोंदणीचे, तात्पुरते किंवा, यथास्थिति, कायमस्वरूपी, प्रमाणपत्र प्रदर्शित करील;

(दोन) त्यांच्याकडून पुरविल्या जाणाऱ्या प्रत्येक प्रमुख सेवा, सुविधा, कार्यपद्धती व तपासण्या यांच्यासाठी तिच्याकडून साधारणपणे आकारल्या जाणाऱ्या दरांची व शुल्कांची यादी, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांमध्ये प्रदर्शित करील आणि तिच्या संकेतस्थळावर देखील प्रसिद्ध करील.

(२) प्रत्येक चिकित्सा आस्थापना, तिने दिलेल्या सेवांसाठी, अशा प्रकारे प्रदर्शित केलेल्या दरांपेक्षा अधिक नसतील इतके दर आकारील आणि प्रत्येक रुग्णाला, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात बाबनिहाय देयक देईल, आणि, मागणी केल्यावर, आकारलेल्या दराचा सविस्तर तपशील सादर करील.

चिकित्सा आस्थापनांचे वर्गीकरण.

१२. (१) विविध पद्धतींच्या चिकित्सा आस्थापनांचे, शासनाकडून, वेळोवेळी, विहित करण्यात येईल अशा प्रवर्गांमध्ये वर्गीकरण करण्यात येईल.

(२) शासनास, स्थानिक परिस्थिती विचारात घेऊन, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या वेगवेगळ्या प्रवर्गांच्या वर्गीकरणासाठी वेगवेगळी मानके विहित करता येतील.

रुग्णांच्या हक्कांची सनद.

१३. (१) प्रत्येक चिकित्सा आस्थापना, रुग्णांच्या हक्कांचे पालन करील आणि त्यांची अंमलबजावणी करील. प्रत्येक रुग्णाला,-

(क) आजाराचे स्वरूप, त्याचे रोग निदान, तपासणीची व उपचारांची प्रस्तावित योजना आणि त्याचा अंदाजित खर्च यासंबंधीची माहिती मिळण्याचा;

(ख) त्याचा वैद्यकीय अभिलेख आणि केस पेपर पाहण्याचा आणि त्यांच्या प्रती मिळण्याचा;

(ग) कोणतीही तपासणी किंवा प्रक्रिया करण्यापूर्वी सूचित संमती देण्याचा किंवा नाकारण्याचा;

(घ) दुसऱ्या तज्ज्ञ डॉक्टरांचे मत घेण्याचा;

(ङ) त्याच्या उपचारादरम्यान खासगीपणा, गोपनीयता व मानवी प्रतिष्ठा राखण्याचा;

(च) उपचार घेताना, समानतेचा म्हणजेच, धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान, भाषा किंवा विकलांगता या कारणांवरून कोणताही भेदभाव न करण्याचा; आणि

(छ) कलम ११ अन्वये दरांची माहिती मिळण्याचा आणि बाबनिहाय देयक मिळण्याचा; हक्क असेल.

(२) पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेले हक्क, प्रदर्शित करण्याची आणि त्यांची अंमलबजावणी करण्याची रीत विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

(३) प्रत्येक चिकित्सा आस्थापना, तिच्या आवारामध्ये एखाद्या ठळक जागी, पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेले हक्क, मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांमध्ये प्रदर्शित करील.

प्रकरण चार

नोंदणीची कार्यपद्धती

तात्पुरत्या नोंदणी प्रमाणपत्रासाठी अर्ज.

१४. (१) कलम ९ अन्वये चिकित्सा आस्थापनांची नोंदणी करण्याच्या प्रयोजनार्थ, विहित शुल्कासह विहित नमुन्यातील अर्ज, प्राधिकरणाकडे सादर करण्यात येईल.

(२) हा अधिनियम किंवा त्याखाली केलेले नियम या अन्वये विहित करण्यात येईल अशा नमुन्यामध्ये व अशा रीतीने आणि अशा तपशिलांसह अर्ज करण्यात येईल.

(३) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या वेळी अस्तित्वात असलेली कोणतीही चिकित्सा आस्थापना, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीच्या आत, किंवा तिच्या नोंदणीचा विद्यमान कालावधी समाप्त होण्यापूर्वी सहा महिन्यांच्या आत, यापैकी जो अगोदर घडेल त्या कालावधीत, तिच्या तात्पुरत्या नोंदणीकरिता प्राधिकरणाकडे अर्ज करील.

तात्पुरते नोंदणी प्रमाणपत्र.

१५. प्राधिकरण, असा अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून दहा दिवसांच्या कालावधीच्या आत, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात आणि असा तपशील व अशी माहिती अंतर्भूत असलेले तात्पुरते नोंदणी प्रमाणपत्र अर्जदारास देईल.

तात्पुरत्या नोंदणीपूर्वी कोणतीही चौकशी न करणे.

१६. (१) प्राधिकरण, तात्पुरते नोंदणी प्रमाणपत्र देण्यापूर्वी कोणतीही चौकशी करणार नाही.

(२) प्राधिकरण, तात्पुरते नोंदणी प्रमाणपत्र देण्यात आले असले तरी, तात्पुरते नोंदणी प्रमाणपत्र देण्यात आल्यापासून पंचेचाळीस दिवसांच्या कालावधीच्या आत, अशा रीतीने तात्पुरत्या स्वरूपात नोंदणी केलेल्या चिकित्सा आस्थापनेचा सर्व तपशील, विहित करण्यात येईल अशा रीतीने प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करील.

तात्पुरत्या नोंदणीची वैधता.

१७. कलम २२ च्या तरतुदींना अधीन राहून, प्रत्येक तात्पुरती नोंदणी ही, नोंदणी प्रमाणपत्र दिल्याच्या दिनांकापासून सहाव्या महिन्यांच्या शेवटच्या दिवसापर्यंत वैध असेल आणि अशी नोंदणी नूतनीकरण करण्यायोग्य असेल.

दुबार प्रमाणपत्र.

१८. प्राधिकरण, जर प्रमाणपत्र हरविले असेल, नष्ट झाले असेल, विरूपित झाले असेल किंवा खराब झाले असेल तर, चिकित्सा आस्थापनेच्या विनंतीवरून व विहित करण्यात येईल असे शुल्क प्रदान केल्यावर, दुबार प्रमाणपत्र देईल.

प्रमाणपत्र अहस्तांतरणीय असणे.

१९. (१) नोंदणी प्रमाणपत्र, अहस्तांतरणीय असेल.

(२) चिकित्सा आस्थापनेची मालकी किंवा नाव किंवा व्यवस्थापन यामध्ये झालेला बदल, विहित करण्यात येईल अशा रीतीने, प्राधिकरणाला कळविण्यात येईल.

(३) प्रवर्ग किंवा स्थान बदलले असेल, किंवा चिकित्सा आस्थापना म्हणून कार्य करण्याचे बंद झाले असेल तर, अशा चिकित्सा आस्थापनेच्या बाबतीतील नोंदणी प्रमाणपत्र, प्राधिकरणाकडे परत करण्यात येईल आणि चिकित्सा आस्थापना, नोंदणी प्रमाणपत्र मिळण्यासाठी नव्याने अर्ज करील.

नोंदणी समाप्त झाल्याची प्रसिद्धी.

२०. प्राधिकरण, ज्या चिकित्सा आस्थापनांची नोंदणी समाप्त झाली असेल अशा चिकित्सा आस्थापनांची नावे, विहित करण्यात येईल अशा वेळेत व अशा रीतीने प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करील.

नोंदणीचे नूतनीकरण करणे.

२१. नोंदणीच्या नूतनीकरणाचा अर्ज, तात्पुरत्या नोंदणी प्रमाणपत्राची वैधता समाप्त होण्याच्या तीस दिवस आधी करण्यात येईल आणि तात्पुरत्या नोंदणीच्या समाप्तीनंतर नूतनीकरणाचा अर्ज करण्यात आला असेल त्याबाबतीत, प्राधिकरण, विहित करण्यात येईल असे वाढीव शुल्क प्रदान केल्यावर नोंदणीच्या नूतनीकरणास मान्यता देईल.

तात्पुरत्या नोंदणीची मुदतमर्यादा.

२२. जेव्हा ज्या चिकित्सा आस्थापनांच्या बाबतीत, शासनाकडून मानके अधिसूचित करण्यात आलेली असतील अशा चिकित्सा आस्थापनांच्या बाबतीत,-

(एक) या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी ज्या चिकित्सा आस्थापना अस्तित्वात आलेल्या असतील त्या चिकित्सा आस्थापनांच्या बाबतीत, मानकांच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या कालावधीनंतर;

(दोन) या अधिनियमाच्या प्रारंभानंतर, परंतु मानकांच्या अधिसूचनेपूर्वी ज्या चिकित्सा आस्थापना अस्तित्वात आलेल्या असतील त्या चिकित्सा आस्थापनांच्या बाबतीत, मानकांच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या कालावधीमध्ये ; आणि

(तीन) मानके अधिसूचित करण्यात आल्यानंतर ज्या चिकित्सा आस्थापना अस्तित्वात आलेल्या असतील त्या चिकित्सा आस्थापनांच्या बाबतीत, मानकांच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीमध्ये,

तात्पुरत्या नोंदणीस किंवा तिच्या नूतनीकरणास मान्यता देण्यात येणार नाही.

कायमस्वरूपी नोंदणीसाठी अर्ज.

२३. (१) जिला तात्पुरती नोंदणी मिळालेली आहे अशी चिकित्सा आस्थापना, तात्पुरती नोंदणी समाप्त होण्याच्या साठ दिवस आधी, तिच्या कायमस्वरूपी नोंदणीसाठी अर्ज करील.

(२) कायमस्वरूपी नोंदणीचा अर्ज, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा शुल्कासह प्राधिकरणाकडे करण्यात येईल.

अर्जाची पडताळणी.

२४. चिकित्सा आस्थापना, विहित केलेल्या किमान मानकांचे अनुपालन केल्याचा पुरावा विहित करण्यात येईल अशा रीतीने, सादर करील.

आक्षेप दाखल करण्यासाठी माहिती प्रदर्शित करणे.

२५. चिकित्सा आस्थापनेने, विहित केलेल्या किमान मानकांचे अनुपालन केलेले असल्याचा आवश्यक तो पुरावा सादर केल्यावर, लवकरात लवकर, प्राधिकरण, चिकित्सा आस्थापनेने विहित केलेल्या किमान मानकांचे अनुपालन केल्याबाबत सादर केलेले सर्व पुरावे, विहित करण्यात येईल अशा रीतीने जनतेच्या माहितीसाठी व कोणतेही असल्यास, आक्षेप दाखल करण्याकरिता कायमस्वरूपी नोंदणी करण्याच्या प्रक्रियेपूर्वी तीस दिवसांच्या कालावधीसाठी प्रदर्शित करण्याची व्यवस्था करील.

आक्षेप कळविणे.

२६. जर पूर्ववर्ती कलमात निर्दिष्ट केलेल्या कालावधीत आक्षेप प्राप्त झाले असतील तर, पंचेचाळीस दिवसांच्या कालावधीत अशा आक्षेपांवर उत्तर देण्यासाठी ते प्राधिकरणाद्वारे चिकित्सा आस्थापनेला कळविण्यात येतील.

कायमस्वरूपी नोंदणीसाठी मानके.

२७. चिकित्सा आस्थापनेने, शासनाने नोंदणीसाठी विहित केलेल्या मानकांची पूर्तता केलेली असेल केवळ तेव्हाच कायमस्वरूपी नोंदणीस मंजुरी देण्यात येईल.

नोंदणी मंजूर करणे किंवा नामंजूर.

२८. प्राधिकरण, विहित कालावधी संपल्यानंतर तात्काळ आदेश देईल आणि त्यानंतर पुढील तीस दिवसांच्या आत, एकतर,-

(क) कायमस्वरूपी नोंदणीचा अर्ज मंजूर करील ; किंवा

(ख) तो अर्ज नाकारील :

परंतु, जर प्राधिकरणाने कायमस्वरूपी नोंदणीचा अर्ज नामंजूर केला असेल तर, ते, त्याची कारणे नमूद करील.

कायमस्वरूपी नोंदणी प्रमाणपत्र.

२९. (१) प्राधिकरण, जर त्याने चिकित्सा आस्थापनेचा अर्ज मंजूर केला असेल तर, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा तपशिलांचा अंतर्भाव करून कायमस्वरूपी नोंदणी प्रमाणपत्र देईल.

(२) असे प्रमाणपत्र, ते दिल्याच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीसाठी वैध असेल.

(३) पोट-कलम (१) च्या प्रयोजनांसाठी कलमे ११, १९, २० व २१ यांच्या तरतुदी देखील लागू असतील.

(४) कायमस्वरूपी नोंदणी प्रमाणपत्राच्या नूतनीकरणाचे अर्ज कायमस्वरूपी नोंदणी प्रमाणपत्राची वैधता समाप्त होण्यापूर्वी सहा महिन्यांच्या आत, करण्यात येतील आणि, जर विनिर्दिष्ट कालावधीत नूतनीकरणाचा अर्ज सादर केला नाही तर, प्राधिकरण, विहित करण्यात येईल असे वाढीव शुल्क व दंड प्रदान केल्यावर नोंदणीचे नूतनीकरण करण्यास मंजुरी देऊ शकेल.

कायमस्वरूपी नोंदणीसाठी नव्याने अर्ज करणे.

३०. कायमस्वरूपी नोंदणीचा अर्ज नामंजूर केल्यामुळे, चिकित्सा आस्थापनेला, कलम २३ अन्वये कायमस्वरूपी नोंदणीसाठी नव्याने अर्ज करण्यापासून आणि ज्या कारणांवरून आधीचा अर्ज नामंजूर करण्यात आला होता त्या त्रुटींची दुरुस्ती केल्याचा, आवश्यक असेल असा पुरावा सादर केल्यानंतर, मनाई केली जाणार नाही.

नोंदणी रद्द करणे.

३१. (१) जर, कोणत्याही चिकित्सा आस्थापनेची नोंदणी करण्यात आल्यानंतर,-

(क) नोंदणीच्या शर्तींचे अनुपालन करण्यात येत नाही ; किंवा

(ख) चिकित्सा आस्थापनेचे व्यवस्थापन सोपविण्यात आलेल्या व्यक्तीला या अधिनियमान्वये शिक्षेस पात्र असलेल्या अपराधाबद्दल दोषसिद्ध ठरविण्यात आले आहे,

याबाबत कोणत्याही वेळी प्राधिकरणाची खात्री पटली असेल तर, प्राधिकरणास, चिकित्सा आस्थापनेस नोटिशीमध्ये नमूद केलेल्या कारणांसाठी तिची या अधिनियमाखालील नोंदणी रद्द का करण्यात येऊ नये याबाबत तीन महिन्यांच्या आत, कारणे दाखविण्यासाठी नोटीस देता येईल.

(२) जर चिकित्सा आस्थापनेला वाजवी संधी दिल्यानंतर, या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींचा किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमांचा भंग करण्यात आला आहे याबाबत प्राधिकरणाची खात्री पटली असेल तर, त्यास, अशा चिकित्सा आस्थापनेविरुद्ध करता येईल अशा अन्य कोणत्याही कारवाईस बाध न येता, आदेशाद्वारे, तिची नोंदणी रद्द करता येईल.

(३) पोट-कलम (२) अन्वये काढलेला प्रत्येक आदेश,-

(क) जेव्हा अशा आदेशाविरुद्ध कोणतेही अपील दाखल करण्यात आले नसेल त्या बाबतीत, अशा अपिलासाठी विहित केलेला कालावधी समाप्त झाल्यावर लगेच ; आणि

(ख) जेव्हा असे अपील दाखल करण्यात आले असेल आणि ते खारीज करण्यात आले असेल त्या बाबतीत, असे खारीज केल्याच्या आदेशाच्या दिनांकापासून,

अंमलात येईल :

परंतु, प्राधिकरणास, कारणे लेखी नमूद करून, नोंदणी रद्द केल्यानंतर, रुग्णाच्या आरोग्यास व सुरक्षेस निकटवर्ती धोका पोहोचण्याची शक्यता असेल तर, अशी चिकित्सा आस्थापना चालू ठेवण्यास तात्काळ प्रतिबंध करता येईल.

नोंदणीकृत चिकित्सा आस्थापनांची तपासणी.

३२. (१) प्राधिकरणास किंवा प्राधिकरणाने किंवा परिषदेने किंवा शासनाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास, कोणतीही नोंदणीकृत चिकित्सा आस्थापना, तिची इमारत, प्रयोगशाळा व उपकरणे यांची तसेच, त्या चिकित्सा आस्थापना करीत असलेले किंवा तिने केलेले काम यांची, प्राधिकरणाकडून निदेश देण्यात येईल अशा बहु-सदस्यीय तपासणी पथकाकडून तपासणी किंवा त्या बाबतीत चौकशी करवून घेण्याचा आणि चिकित्सा आस्थापनेशी संबंधित असलेल्या इतर कोणत्याही बाबींच्या संबंधात चौकशी करवून घेण्याचा अधिकार असेल आणि ती आस्थापना, त्याबाबतीत अभिवेदन करण्यास हक्कदार असेल.

(२) प्राधिकरण, अशा तपासणीच्या किंवा चौकशीच्या निष्कर्षांच्या संदर्भात, त्या प्राधिकरणाची मते त्या चिकित्सा आस्थापनेला कळवील आणि प्राधिकरणास, त्यावरील चिकित्सा आस्थापनेच्या अभिप्रायाची खात्री केल्यानंतर, करावयाच्या कारवाईबाबत त्या आस्थापनेला सल्ला देता येईल.

(३) चिकित्सा आस्थापना, अशा तपासणीच्या किंवा चौकशीच्या निष्कर्षांवरून जी करण्याचे प्रस्तावित असेल किंवा जी करण्यात आली असेल अशा कारवाईचा, कोणतीही असल्यास, अहवाल प्राधिकरणाला कळवील आणि असा अहवाल, प्राधिकरणाकडून निदेश देण्यात येईल अशा मुदतीत सादर करण्यात येईल.

(४) जेव्हा चिकित्सा आस्थापनेने, प्राधिकरणाची खात्री पटण्यासाठी वाजवी वेळेत कारवाई केली नसेल त्याबाबतीत, प्राधिकरणास, त्या चिकित्सा आस्थापनेने सादर केलेला कोणताही खुलासा किंवा केलेले अभिवेदन विचारात घेतल्यानंतर, त्यास योग्य वाटतील असे निदेश, त्यात नमूद करण्यात येईल अशा वेळेत देता येतील आणि चिकित्सा आस्थापना अशा निदेशांचे पालन करील.

प्रवेश करण्याचा अधिकार.

३३. प्राधिकरणास किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास, कोणीही, नोंदणी न करता चिकित्सा आस्थापना चालवीत आहे असा संशय घेण्यास कोणतेही कारण असेल तर, विहित केलेल्या रीतीने कोणत्याही वाजवी वेळेत त्या आस्थापनेत प्रवेश करता येईल व झडती घेता येईल आणि ती चिकित्सा आस्थापना, तपासणीसाठी किंवा चौकशीसाठी वाजवी सुविधा पुरवील आणि त्याबाबतीत अभिवेदन करण्यास हक्कदार असेल.

शुल्क आकारणे.

३४. शासनास, विहित करण्यात येतील अशा चिकित्सा आस्थापनांच्या विविध प्रवर्गांसाठी, शुल्क आकारता येईल.

अपील.

३५. (१) नोंदणी प्रमाणपत्र देण्यास किंवा त्याचे नूतनीकरण करण्यास नकार देणाऱ्या, अथवा नोंदणी प्रमाणपत्र रद्द करणाऱ्या नोंदणी प्राधिकरणाच्या आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, विहित करण्यात येईल अशा रीतीने व अशा कालावधीत, शासनाकडून अधिसूचित करण्यात येईल अशा आयुक्त, आरोग्य सेवा यांच्याकडे अपील दाखल करता येईल.

(२) अपील प्राधिकरणाच्या आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, विहित करण्यात येईल अशा रीतीने व अशा कालावधीत शासनाकडे अपील दाखल करता येईल :

परंतु, अपील प्राधिकरणास किंवा शासनास, अपीलकारास विहित मुदतीत अपील दाखल करण्यास पुरेशा कारणामुळे प्रतिबंध झाला होता अशी त्याची खात्री पटली तर, विहित कालावधी संपल्यानंतर केलेले अपील दाखल करून घेता येईल.

(३) पोट-कलम (१) व (२) खालील प्रत्येक अपील, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा शुल्कासह करण्यात येईल.

प्रकरण पाच

चिकित्सा आस्थापनांची नोंदवही

प्राधिकरणाद्वारे चिकित्सा आस्थापनांची नोंदवही ठेवणे.

३६. (१) प्राधिकरण, त्याच्या स्थापनेपासून दोन वर्षांच्या कालावधीत, त्याने नोंदणी केलेल्या चिकित्सा आस्थापनांची नोंदवही संकलित करील, प्रसिद्ध करील आणि ती डिजिटल स्वरूपात ठेवील आणि विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व रीतीने ठेवावयाच्या नोंदवहीत, अशा प्रकारे देण्यात आलेल्या प्रमाणपत्राचे तपशील नोंदवील.

(२) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये चिकित्सा आस्थापनांच्या नोंदणीसाठी स्थापन करण्यात आलेल्या अन्य कोणत्याही प्राधिकरणासह, प्रत्येक प्राधिकरण हे, राज्यातील नोंदणी प्राधिकरणाने ठेवलेल्या नोंदवह्यांशी राज्य नोंदवही सातत्याने अद्ययावत ठेवली जात आहे, याची सुनिश्चिती करण्यासाठी, विहित करण्यात येईल अशा रीतीने चिकित्सा आस्थापनांच्या नोंदवहीमध्ये केलेल्या प्रत्येक नोंदीची प्रत, डिजिटल स्वरूपात परिषदेला देईल.

परिषदेद्वारे चिकित्सा आस्थापनांची नोंदवही ठेवणे.

३७. परिषद, चिकित्सा आस्थापनांच्या बाबतीत, चिकित्सा आस्थापनांची नोंदवही म्हणून ओळखली जाणारी एक नोंदवही, शासनाकडून विहित करण्यात येईल अशा डिजिटल स्वरूपात आणि अशा नमुन्यात व अशा तपशिलांचा अंतर्भाव असलेल्या स्वरूपात ठेवील.

प्रकरण सहा

अपराध

अपराध.

३८. जो कोणी, या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करील, तो, त्या संबंधात इतरत्र कोणत्याही शास्तीची तरतूद करण्यात आली नसेल तर, पहिल्या अपराधाबद्दल पन्नास हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या, दुसऱ्या कोणत्याही अपराधाबद्दल एक लाख रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या द्रव्यदंडाच्या आणि त्यानंतरच्या कोणत्याही अपराधाबद्दल पाच लाख रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल.

नोंदणी न केल्याबद्दल शास्ती.

३९. (१) जो कोणी, नोंदणी न करता, चिकित्सा आस्थापना चालवीत असेल तो, पहिल्या उल्लंघनाबद्दल, एक लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतकी शास्ती, दुसऱ्या उल्लंघनाबद्दल तीन लाख रुपयांपर्यंत वाढविता येईल इतकी शास्ती आणि त्यानंतरच्या कोणत्याही उल्लंघनाबद्दल पाच लाख रुपयांपर्यंत वाढविता येईल इतकी शास्ती प्रदान करण्यास पात्र असेल.

(२) जो कोणी, या अधिनियमान्वये जिची यथोचितरीत्या नोंदणी केलेली नसेल त्या चिकित्सा आस्थापनेत जाणूनबुजून सेवा करील, तो, एक लाख रुपयांपर्यंत वाढविता येईल इतकी शास्ती प्रदान करण्यास पात्र असेल.

(३) पोट-कलमे (१) व (२) खालील अभिनिर्णय करण्याच्या प्रयोजनार्थ, प्राधिकरण, कोणतीही शास्ती लादण्याच्या प्रयोजनासाठी संबंधित असलेल्या कोणत्याही व्यक्तीला म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, विहित केलेल्या रीतीने चौकशी करील.

(४) प्राधिकरणास, चौकशी करताना, प्राधिकरणाच्या मते, चौकशीच्या विषयवस्तूसाठी जो उपयुक्त असेल किंवा संबंधित असेल असा पुरावा देण्यासाठी किंवा कोणताही दस्तऐवज सादर करण्यासाठी, प्रकरणाच्या तथ्यांशी किंवा परिस्थितीशी परिचित असलेल्या कोणत्याही व्यक्तीवर समन्स बजावण्याचा व तिला उपस्थित राहण्यास भाग पाडण्याचा अधिकार असेल, आणि जर अशा चौकशीवरून, त्या व्यक्तीने पोट-कलमे (१) व (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या तरतुदींचे अनुपालन करण्यात कसूर केली आहे याबाबत प्राधिकरणाची खात्री पटली असेल तर, प्राधिकरणास, आदेशाद्वारे, आदेश दिल्यापासून तीस दिवसांच्या आत जमा करावयाची, त्या पोट-कलमांमध्ये विनिर्दिष्ट केलेली शास्ती लादता येईल.

(५) प्राधिकरण, शास्तीचे प्रमाण निश्चित करताना, चिकित्सा आस्थापनेचा प्रवर्ग, आकार व प्रकार आणि ती ज्या क्षेत्रात स्थित आहे त्या क्षेत्राची स्थानिक स्थिती विचारात घेईल.

(६) प्राधिकरणाच्या निर्णयाने व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, उक्त निर्णयाच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या कालावधीत, अपील प्राधिकरणाकडे अपील दाखल करता येईल.

(७) पोट-कलम (६) मध्ये निर्दिष्ट केलेले अपील दाखल करण्याची रीत, विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

निदेशाचे पालन न करणे, अडथळा आणणे व माहिती नाकारणे.

४०. (१) जो कोणी, या अधिनियमान्वये, कोणताही निदेश देण्यासाठी अधिकार प्रदान करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून किंवा प्राधिकरणाकडून कायदेशीरपणे देण्यात आलेल्या अशा कोणत्याही निदेशाची, जाणूनबुजून अवज्ञा करील, किंवा या अधिनियमान्वये जी कार्ये पार पाडण्यासाठी अशा व्यक्तीला किंवा प्राधिकरणाला आवश्यक केले असेल किंवा अधिकार प्रदान केला असेल अशी कोणतीही कार्ये पार पाडण्यात अशा कोणत्याही व्यक्तीला किंवा प्राधिकरणाला अडथळा आणील, तो, पाच लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतकी शास्ती प्रदान करण्यास पात्र असेल.

(२) जो कोणी, या अधिनियमाद्वारे किंवा त्या अन्वये कोणतीही माहिती पुरविण्यासाठी फर्माविले असताना, अशी माहिती जाणूनबुजून रोखून धरील किंवा जी खोटी आहे हे माहीत असताना किंवा जी खरी आहे यावर तिचा विश्वास नसेल अशी माहिती देईल, तो, पाच लाख रुपयांपर्यंत वाढविता येईल इतकी शास्ती प्रदान करण्यास पात्र असेल.

(३) पोट-कलमे (१) व (२) अन्वये अभिनिर्णय करण्याच्या प्रयोजनार्थ, प्राधिकरण, शास्ती लादण्याच्या प्रयोजनासाठी, संबंधित असलेल्या कोणत्याही व्यक्तीला म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, विहित केलेल्या रीतीने चौकशी करील.

(४) प्राधिकरणास, चौकशी करताना, प्राधिकरणाच्या मते, चौकशीच्या विषयवस्तूसाठी जो उपयुक्त असेल किंवा संबंधित असेल असा पुरावा देण्यासाठी किंवा कोणताही दस्तऐवज सादर करण्यासाठी, प्रकरणाच्या तथ्याशी किंवा परिस्थितीशी परिचित असलेल्या कोणत्याही व्यक्तीवर समन्स बजावण्याचा व तिला उपस्थित राहण्यास भाग पाडण्याचा अधिकार असेल, आणि जर अशा चौकशीवरून, त्या व्यक्तीने पोट-कलमे (१) व (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या तरतुदींचे पालन करण्यात कसूर केली आहे याबाबत प्राधिकरणाची खात्री पटली असेल तर, प्राधिकरणास, आदेशाद्वारे, असा आदेश दिल्यापासून तीस दिवसांच्या आत जमा करावयाची, त्या पोट-कलमांमध्ये विनिर्दिष्ट केलेली शास्ती लादता येईल.

(५) प्राधिकरण, शास्तीचे प्रमाण निर्धारित करताना, चिकित्सा आस्थापनेचा प्रवर्ग, आकार व प्रकार आणि ती ज्या क्षेत्रात स्थित आहे त्या क्षेत्राची स्थानिक स्थिती, विचारात घेईल.

(६) प्राधिकरणाच्या निर्णयाने व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, उक्त निर्णयाच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या कालावधीत, अपील प्राधिकरणाकडे अपील दाखल करता येईल.

(७) पोट-कलम (६) मध्ये निर्दिष्ट केलेले अपील दाखल करण्याची रीत, विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

किरकोळ त्रुटींबद्दल शास्ती.

४१. जो कोणी, या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींचे किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमांचे उल्लंघन करील, परिणामी कोणत्याही रुग्णाच्या आरोग्यास व सुरक्षेस कोणताही निकटवर्ती धोका उद्भवणार नाही, अशा स्वरूपाच्या त्रुटी निर्माण झाल्या असतील आणि त्या त्रुटी वाजवी वेळेत दुरुस्त करता येऊ शकत असतील तर, तो, पन्नास हजार रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या शास्तीस पात्र असेल.

४२. (१) जेव्हा या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींचे किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमांचे उल्लंघन करणारी व्यक्ती ही, एखादी कंपनी असेल त्या बाबतीत, असे उल्लंघन झाले त्या वेळी ज्या व्यक्तीकडे अशा कंपनीचा प्रभार होता आणि जी व्यक्ती कंपनीचे कामकाज चालविण्यासाठी कंपनीस जबाबदार होती अशी प्रत्येक व्यक्ती, त्याचप्रमाणे कंपनी देखील अशा, उल्लंघनाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार शास्तीस पात्र असेल : कंपन्यांनी केलेले उल्लंघन.

परंतु, जर अशा व्यक्तीने, असे उल्लंघन तिच्या नकळत घडले होते किंवा असे उल्लंघन घडण्यास प्रतिबंध करण्यासाठी तिने योग्य ती सर्व दक्षता बाळगली होती असे सिद्ध केले असेल तर, या पोट-कलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे अशी कोणतीही व्यक्ती, कोणत्याही शिक्षेस पात्र असणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींचे किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमांचे कंपनीने उल्लंघन केले असेल आणि असे उल्लंघन हे, त्या कंपनीचा असा कोणताही संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी यांच्या संमतीने किंवा मूकसंमतीने किंवा त्यांनी केलेल्या कोणत्याही निष्काळजीपणामुळे झाले आहे, असे सिद्ध झाले असेल तर, कंपनीचा असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी, त्या उल्लंघनाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार, ते शास्तीस पात्र असतीलः

स्पष्टीकरण :– या कलमाच्या प्रयोजनार्थ,-

(क) "कंपनी" याचा अर्थ, निगम निकाय, असा आहे आणि त्यामध्ये, भागीदारी संस्थेचा किंवा व्यक्तींच्या इतर संघाचा समावेश होतो ; आणि

(ख) एखाद्या भागीदारी संस्थेच्या संबंधात, "संचालक" याचा अर्थ, त्या भागीदारी संस्थेतील भागीदार, असा आहे.

४३. जो कोणी, शास्तीची रक्कम प्रदान करण्यास कसूर करील, तो, परिषद, अशा व्यक्तीकडून येणे असलेली शास्ती विनिर्दिष्ट असणारे, तिने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने सही केलेले एक प्रमाणपत्र तयार करू शकेल आणि ते प्रमाणपत्र, ज्या जिल्ह्यात अशा व्यक्तीच्या मालकीची कोणतीही मालमत्ता असेल किंवा जेथे ती राहत असेल किंवा तिचा व्यवसाय करीत असेल त्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याकडे पाठवू शकेल, आणि उक्त जिल्हाधिकारी, असे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यावर, त्यात विनिर्दिष्ट केलेली रक्कम, जणू काही ती जमीन महसुलाची थकबाकी होती असे समजून अशा व्यक्तीकडून वसूल करण्याची कार्यवाही करील. शास्तीची वसुली.

प्रकरण सात

परिषदेचा निधी

४४. (१) परिषद, महाराष्ट्र राज्य चिकित्सा आस्थापना परिषद निधी, या नावाने संबोधण्यात येईल असा एक निधी स्थापन करील. परिषदेचा निधी.

(२) निधीमध्ये,-

(क) या अधिनियमान्वये प्राधिकरणाला प्राप्त झालेले सर्व शुल्क ;

(ख) राज्य शासनाकडून किंवा केंद्र सरकारकडून मिळालेली अनुदाने व कर्जे, कोणतीही असल्यास;

(ग) निधींच्या गुंतवणुकींतून मिळणारे उत्पन्न; आणि

(घ) राज्य शासनाद्वारे मान्यता देण्यात येईल अशा कोणत्याही स्रोतातून परिषदेस किंवा प्राधिकरणास प्राप्त झालेला इतर कोणताही पैसा,

यांचा समावेश असेल.

परिषदेचा निधी ज्या उद्दिष्टांसाठी वापरण्यात येईल, ती उद्दिष्टे.

४५. परिषदेचा निधी, पुढील उद्दिष्टांसाठी वापरण्यात येईलः-

(क) परिषदेचा व प्राधिकरणाचा प्रशासकीय व कार्यकारी खर्च भागविणे;

(ख) चिकित्सा आस्थापनांची तपासणी, संनियंत्रण व लेखापरीक्षण करणे;

(ग) या अधिनियमाच्या अंमलबजावणीमध्ये कार्यरत असलेले अधिकारी व कर्मचारी यांचे प्रशिक्षण व क्षमता बांधणी करणे ;

(घ) डिजिटल नोंदणी पोर्टलचा, कोणतेही असल्यास, विकास व परिरक्षण करणे ; आणि

(ङ) राज्य शासन, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे निदेश देईल अशी या अधिनियमाच्या उद्दिष्टांशी संबंधित असलेली इतर प्रयोजने.

लेखे व लेखापरीक्षण.

४६. (१) परिषदेचे लेखे, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा रीतीने, ठेवण्यात येतील आणि अशा दिनांकापूर्वी व अशा कालांतराने त्यांची लेखापरीक्षा करण्यात येईल.

(२) परिषदेच्या लेख्यांची, विहित करण्यात येईल अशा प्राधिकरणाकडून लेखापरीक्षण करण्यात येईल.

(३) लेखापरीक्षा अहवालासह लेखापरीक्षा केलेले लेखे, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येतील.

प्रकरण आठ

संकीर्ण

सद्भावनेने केलेल्या कृतीस संरक्षण.

४७. (१) या अधिनियमाच्या तरतुदींनुसार किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमांनुसार, ,सद्भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचे उद्देशित असलेल्या कोणत्याही गोष्टींबद्दल, प्राधिकरण किंवा परिषदेचा किंवा अपील प्राधिकरणाचा कोणताही प्राधिकारी किंवा कोणताही सदस्य किंवा याबाबतीत प्राधिकृत केलेला कोणताही अधिकारी, यांच्याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही.

(२) या अधिनियमाच्या तरतुदींनुसार किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमानुसार सद्भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचे उद्देशित असलेल्या कोणत्याही गोष्टींमुळे झालेल्या किंवा होण्याचा संभव असलेल्या कोणत्याही हानीच्या किंवा नुकसानीच्या बाबतीत, शासनाविरुद्ध कोणताही दावा किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही.

विवरणे, इत्यादी सादर करणे.

४८. प्रत्येक चिकित्सा आस्थापना, त्याबाबतीत विहित करण्यात येईल अशा कालावधीत किंवा अशा वाढीव कालावधीत, शासनाकडून वेळोवेळी विहित करण्यात येईल अशा रीतीने अशी विवरणे किंवा सांख्यिकी माहिती व अन्य माहिती, प्राधिकरणास किंवा परिषदेस सादर करील.

निदेश देण्याचा अधिकार.

४९. (१) या अधिनियमाच्या पूर्वगामी तरतुदींना बाध न येता, शासनास, परिषदेस व प्राधिकरणास, चिकित्सा आस्थापनेच्या योग्य कामकाजासाठी, विवरणे, सांख्यिकी माहिती व अन्य माहिती सादर करण्यासह असे निदेश देण्याचा अधिकार असेल आणि असे निदेश बंधनकारक असतील.

(२) या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा सार्वजनिक हितासाठी तसे करणे आवश्यक किंवा इष्ट आहे, असे शासनाचे मत असेल तर, त्यास, लेखी आदेशाद्वारे आणि त्यात त्याची कारणे नोंदवून, त्या आदेशामध्ये निर्दिष्ट करण्यात येईल अशी कृती करण्यासाठी किंवा अशी कृती करण्यापासून परावृत्त करण्यासाठी प्राधिकरणास किंवा परिषदेस निदेश देता येतील आणि प्रधिकरण किंवा, यथास्थिति, परिषद अशा निदेशांचे अनुपालन करील.

(३) शासन, पुढील बाबींच्या संबंधात, प्राधिकरणास व राज्य परिषदेस, वेळोवेळी धोरणविषयक निदेश देऊ शकेल,—

(क) सार्वजनिक आरोग्यविषयक प्राधान्ये व कार्यक्रम;

(ख) चिकित्सा आस्थापनांतील गुणवत्ता सुधार उपक्रम;

(ग) रुग्ण सुरक्षा मानके;

(घ) सुलभ व परवडणारी आरोग्य सेवा;

(ङ) इतर आरोग्य कार्यक्रम व योजना यांच्याशी एकात्मीकरण;

(च) आपत्तीपूर्व सुसज्जता व आपत्कालीन प्रतिसाद;

(छ) आरोग्य माहिती प्रणाली व माहितीसामग्री व्यवस्थापन; आणि

(ज) सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाची इतर कोणतीही बाब;

(४) प्राधिकरण व परिषद, दिलेल्या धोरणविषयक निदेशांचे अनुपालन केल्याची सुनिश्चिती करील.

प्राधिकरण, इत्यादींचे कर्मचारी लोकसेवक असणे.

२०२३ चा ४६.

५०. (१) प्राधिकरणाचा व परिषदेचा प्रत्येक कर्मचारी, जेव्हा तो या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींनुसार कार्य करीत असेल तेव्हा किंवा कार्य करण्याचे अभिप्रेत करीत असेल तेव्हा, भारतीय न्याय संहिता, २०२३ च्या कलम २८ मधील पोट-कलम (२) च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

प्रकटने व अहवाल देणे.

५१. (१) प्रत्येक नोंदणीकृत चिकित्सा आस्थापना, वेळोवेळी विहित करण्यात येईल अशा रीतीने, प्राधिकरणाच्या किंवा परिषदेच्या किंवा, यथास्थिति, शासनाच्या संनिरीक्षणाखाली रोगांचा किंवा आरोग्यविषयक घटनांचा अहवाल देईल.

(२) या अधिनियमाखाली केलेल्या नियमांनुसार कळविण्याची गरज असलेल्या रोगांची किंवा आरोग्या विषयक घटनांची यादी, शासनाद्वारे किंवा केंद्र सरकारद्वारे, वेळोवेळी विहित करण्यात येईल किंवा अधिसूचित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

नियम करण्याचा अधिकार.

५२. (१) शासनास, या अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याही तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.

(२) विशेषतः आणि पूर्वगामी अधिकारांच्या सर्वसाधारणतेस बाध न येता, या अधिनियमाअन्वये विहित करण्याची आवश्यकता असलेल्या, किंवा विहित करता येतील अशा सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबींसाठी अशा नियमांमध्ये तरतूद करता येईल.

(३) या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो केल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा अधिक अधिवेशनात मिळून, एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीकरिता, सत्रासीन असताना, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे मांडण्यात येईल, आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने मांडण्यात आला असेल, ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, जर कोणत्याही नियमात कोणताही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत होईल किंवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत होईल, तर, त्यानंतर तो नियम, केवळ अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल, किंवा यथास्थिति, मुळीच अंमलात येणार नाही ; तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा विलोपनामुळे त्या नियमान्वये यापूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

५३. (१) या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, शासनाला, ती अडचण दूर करण्यासाठी आवश्यक किंवा इष्ट वाटतील अशा, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील अशा तरतुदी, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, करता येतीलः

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) या कलमाअन्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांपुढे ठेवण्यात येईल.

निरसन व व्यावृत्ती.

५४. (१) या अधिनियमाच्या प्रारंभास व तेव्हापासून, महाराष्ट्र शुश्रूषागृह नोंदणी अधिनियम, निरसित करण्यात येईल. १९४९ चा १५.

(२) असे निरसन झाले असले तरी,-

(क) चिकित्सा आस्थापनांची नोंदणी करणे आवश्यक करणाऱ्या उक्त निरसित अधिनियमान्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये, नोंदणी केलेल्या सर्व चिकित्सा आस्थापना, अशा आधीच्या कायद्यान्वये ज्या मुदतीसाठी नोंदणी करण्यात आली होती ती विद्यमान मुदत समाप्त होईपर्यंत किंवा या अधिनियमान्वये अशा नोंदणीचे नूतनीकरण करण्यात येईपर्यंत किंवा ती रद्द करण्यात येईपर्यंत, अथवा अशा आस्थापनेने या अधिनियमान्वये तात्पुरती नोंदणी मिळवेपर्यंत, यांपैकी जे आधी घडेल तोपर्यंत, वैध असतील.

(ख) निरसित अधिनियमान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा केलेली कोणतीही कारवाई, या अधिनियमाच्या तत्सम तरतुदींन्वये करण्यात आलेली गोष्ट असल्याचे किंवा केलेली कारवाई असल्याचे मानण्यात येईल.

(ग) निरसित अधिनियमान्वये संपादित केलेला, उपार्जित केलेला किंवा अंतर्भूत असलेला कोणताही हक्क, विशेषाधिकार, आबंधन किंवा दायित्व यांच्या बाबतीतील कोणतीही कार्यवाही किंवा उपाययोजना ही, जणू काही हा अधिनियम पारित करण्यात आला नव्हता असे समजून सुरु करता येईल किंवा चालू ठेवता येईल किंवा अंमलात राहील.

(घ) निरसित अधिनियमान्वये प्रदेय असलेले कोणतेही शुल्क, द्रव्यदंड किंवा शास्ती या अधिनियमान्वये वसूल करता येईल.

उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र राज्यातील आरोग्य सेवा क्षेत्रामध्ये, व्यक्ती, खाजगी संस्था, विश्वस्तसंस्था, स्थानिक प्राधिकरणे, किंवा शासकीय संस्था यांच्याकडून चालवण्यात येत असलेल्या, विविध मान्यताप्राप्त वैद्यक पद्धतींतील, रुग्णालये, शुश्रूषागृहे, प्रसूतीगृहे, चिकित्सालये, रोगनिदान केंद्रे, वैद्यकीय प्रयोगशाळा, इत्यादींसारख्या रोगनिदानात्मक व उपचार सेवा पुरविणाऱ्या मोठ्या संख्येतील चिकित्सा आस्थापनांचा समावेश आहे.

२. महाराष्ट्र शुश्रूषागृहे नोंदणी अधिनियम (१९४९ चा १५) यामध्ये, राज्यातील शुश्रूषागृहांची व प्रसूतीगृहांची नोंदणी व त्यांची तपासणी करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित असलेला विवक्षित प्रयोजनांसाठी तरतूद केलेली आहे. काळाच्या ओघात, वैद्यकीय प्रयोगशाळा, दिवसोपचार केंद्र, चिकित्सालये, इत्यादींसारख्या विविध प्रकारच्या चिकित्सा आस्थापना राज्यात विकसित झालेल्या आहेत. तथापि, उक्त शुश्रूषागृहे अधिनियमाची कक्षा केवळ शुश्रूषागृहे व प्रसूतीगृहे यांच्या पुरतीच मर्यादित आहे. शुश्रूषागृहे व प्रसूतीगृहे वगळता, सर्व प्रकारच्या चिकित्सा आस्थापनांद्वारे पुरविल्या जाणाऱ्या आरोग्य सेवांचे नियमन करण्यासाठी राज्यात कोणताही कायदा नाही. संसदेने काही राज्यांकरिता, त्यांच्या विनंतीवरून, अशा राज्यांतील सर्व चिकित्सा आस्थापनांचे नियमन करण्याकरिता चिकित्सा आस्थापना (नोंदणी व नियमन) अधिनियम, २०१० (२०१० चा २३) अधिनियमित केला आहे.

सर्व मान्यताप्राप्त वैद्यक पद्धतीच्या सर्व प्रकारच्या चिकित्सा आस्थापनांच्या कामकाजात पारदर्शकता, उत्तरदायित्व व किमान मानकांचे अनुपालन याची सुनिश्चिती करण्याच्या आणि त्यांच्याकडून पुरविण्यात येतील अशा सेवांचे नियमन करण्याच्या दृष्टीने, उक्त शुश्रूषागृहे अधिनियम निरसित करून, उक्त केंद्रीय अधिनियमासारखा एक कायदा अधिनियमित करणे इष्ट आहे, असे शासनास वाटते.

३. प्रस्तावित कायद्याची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत :—

(एक) चिकित्सा आस्थापनांची किमान मानके निर्धारित करण्याकरिता आणि त्यांच्याकडून पुरवण्यात येणाऱ्या सेवा विनिर्दिष्ट करण्याकरिता, वेगवेगळ्या मान्यताप्राप्त वैद्यक पद्धतींच्या विविध परिषदांच्या प्रतिनिधींचा समावेश असलेली, महाराष्ट्र राज्य चिकित्सा आस्थापना परिषद घटित करणे ;

(दोन) राज्यातील वेगवेगळ्या क्षेत्रांसाठी चिकित्सा आस्थापना नोंदणी प्राधिकरण घटित करणे; जे अहस्तांतरणीय आहे अशा तात्पुरत्या तसेच कायमस्वरुपी नोंदणी प्रमाणपत्राच्या आणि नोंदणीचे, नूतनीकरणाच्या व ती रद्द करण्याच्या तरतुदींसह, चिकित्सा आस्थापनांची नोंदणी करणे;

(तीन) चिकित्सा आस्थापनांच्या नोंदणी प्रमाणपत्रासह त्यांच्याकडून पुरवण्यात येणाऱ्या सेवांचे दर व आकार तिच्या आवारातील ठळक जागी अनिवार्यपणे प्रदर्शित करण्यासाठी तरतूद करणे ;

(चार) आजाराचे स्वरूप, त्याचे रोगनिदान, उपचाराची योजना व त्याचा अंदाजित खर्च यांच्याशी संबंधित असलेली माहिती मिळण्याच्या हक्कासह, रुग्णाच्या हक्कांची सनद यांसाठी तरतूद करणे ;

(पाच) नोंदणीकृत चिकित्सा आस्थापनांच्या तपासणीची तरतूद करणे ;

(सहा) चिकित्सा आस्थापनांची नोंदवही ठेवण्यासाठी आणि ती अद्ययावत ठेवण्यासाठी तरतूद करणे ;

(सात) या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केल्यास अपराध व शिक्षा यांसाठी तरतूद करणे ;

(आठ) महाराष्ट्र राज्य चिकित्सा आस्थापना परिषदेचा निधी व लेखे आणि त्यांचे लेखापरीक्षण यासाठी तरतूद करणे ;

(नऊ) या अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्य शासनाद्वारे निदेश देण्याच्या अधिकारांची तरतूद करणे ;

(दहा) इतर तत्संबंधित संकीर्ण तरतुदी करणे.

४. वरील उद्दिष्टे साध्य करणे, हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक २ जुलै, २०२६.

प्रकाश आबिटकर,
सार्वजनिक आरोग्य मंत्री.

वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन

या विधेयकात, वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहेत :—

खंड १(२). या खंडान्वये, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास, हा अधिनियम अंमलात आणण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

खंड ३. या खंडान्वये, राज्य शासनाकडे पुढील अधिकार घेण्यात आले आहेत :—

(एक) उप-खंड (१) मधील, या अधिनियमान्वये तिला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापरकरण्यासाठी आणि तिला नेमून दिलेली कार्ये पार पाडण्यासाठी महाराष्ट्र राज्य चिकित्सा आस्थापना परिषद म्हणून ओळखला जाणारा एक निकाय, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, घटित करण्याचा;

(दोन) उप-खंड (४) मधील, परिषदेचे अधिकारी व इतर कर्मचारी यांना प्रदेय असलेले वेतन व भत्ते आणि त्यांच्या सेवाशर्ती विहित करण्याचा;

(तीन) उप-खंड (९) मधील, परिषदेचा सचिव व इतर सचिवालयीन कर्मचारीवर्ग नियुक्त करण्याचा.

खंड ७. या खंडान्वये, या अधिनियमान्वये चिकित्सा आस्थापनांचे वर्गीकरण करण्याची मानके निर्धारित करण्याची कार्यपद्धती विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

खंड ८. या खंडान्वये, राज्य शासनाकडे पुढील अधिकार घेण्यात आले आहेत :—

(एक) उप-खंड (१) मधील, चिकित्सा आस्थापनांच्या नोंदणीसाठी, चिकित्सा आस्थापना नोंदणी प्राधिकरण या नावाने संबोधले जाणारे एक प्राधिकरण, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, घटित करण्याचा;

(दोन) उप-खंड (२) मधील, चिकित्सा आस्थापना नोंदणी प्राधिकरणाच्या सदस्यांची संख्या विहित करण्याचा;

(तीन) उप-खंड (३) मधील, उक्त प्राधिकरणाचे अधिकार व कार्यपद्धती विहित करण्याचा;

(चार) उप-खंड (४) मधील, नोंदणी व नोंदणीच्या नूतनीकरण्याचे शुल्क आणि प्राधिकरणाची इतर कार्ये विहित करण्याचा.

खंड १०(१). या खंडान्वये, चिकित्सा आस्थापनेची नोंदणी करण्याच्या व ती पुढे चालू ठेवण्याच्या शर्ती विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

खंड ११. या खंडान्वये, चिकित्सा आस्थापनेमध्ये दर व सेवा प्रदर्शित करण्याची रीत व शर्ती विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

खंड १२. या खंडान्वये, विविध मान्यताप्राप्त वैद्यक पद्धतींच्या चिकित्सा आस्थापनांचे प्रवर्ग आणि वेगवेगळी मानके विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

खंड १३ (२). या खंडान्वये, चिकित्सा आस्थापनेमधील रुग्णांच्या हक्कांची अंमलबजावणी करण्याची आणि ते प्रदर्शित करण्याची रीत विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

खंड १४. या खंडान्वये, चिकित्सा आस्थापनेच्या नोंदणीचा नमुना, रीत व शुल्क विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

खंड १५. या खंडान्वये, चिकित्सा आस्थापनेच्या तात्पुरत्या नोंदणी प्रमाणपत्राचा नमुना व तपशील विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

खंड १६(२). या खंडान्वये, चिकित्सा आस्थापनेचे तात्पुरते प्रमाणपत्र प्रसिद्ध करण्याची रीत विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

खंड १८. या खंडान्वये, चिकित्सा आस्थापनेला दुबार प्रमाणपत्र देण्याचे शुल्क विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

खंड १९. या खंडान्वये, चिकित्सा आस्थापनेची मालकी किंवा व्यवस्थापन यामध्ये झालेल्या बदलाबाबत प्राधिकरणाला कळविण्याची रीत विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

खंड २०. या खंडान्वये, ज्या चिकित्सा आस्थापनांची नोंदणी समाप्त झालेली आहे त्या आस्थापनांची नावे, विहित करण्यात येईल अशा वेळेत व अशा रीतीने प्रसिद्ध करण्याची रीत विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

खंड २१. या खंडान्वये, तात्पुरत्या नोंदणीच्या नुतनीकरणासाठी विलंब शुल्क विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

खंड २३(२). या खंडान्वये, कायमस्वरूपी नोंदणीसाठी शुल्क विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

खंड २४. या खंडान्वये, चिकित्सा आस्थापनेने विहित केलेल्या किमान मानकांचे अनुपालन केलेले असण्याचा पुरावा सादर करण्याची रीत विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

खंड २५. या खंडान्वये, चिकित्सा आस्थापनेने विहित केलेल्या किमान मानकांचे अनुपालन केलेले असल्याचा जनतेच्या माहीतीसाठी आक्षेप दाखल करण्याची रीत विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

खंड २९. या खंडान्वये, राज्य शासनाकडे पुढील अधिकार घेण्यात आले आहेत :—

(एक) उप-खंड (१) मधील, कायमस्वरूपी नोंदणी प्रमाणपत्राचा नमुना व तपशील विहित करण्याचा;

(दोन) उप-खंड (४) मधील, कायमस्वरूपी नोंदणीच्या नुतनीकरणासाठी वाढीव शुल्क व शास्ती विहित करण्याचा.

खंड ३३. या खंडान्वये, चिकित्सा आस्थापनेची तपासणीसाठी प्रवेश करण्याची व झडती घेण्याची रीत विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

खंड ३४. या खंडान्वये, चिकित्सा आस्थापनेच्या विविध प्रवर्गांसाठी शुल्क विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

खंड ३५. या खंडान्वये, प्राधिकरणाच्या आदेशाविरुद्ध अपील दाखल करण्याचा नमुना व रीत विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

खंड ३६. या खंडान्वये, चिकित्सा आस्थापनांची नोंदवही ठेवण्याचा नमुना व रीत विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

खंड ३७. या खंडान्वये, चिकित्सा आस्थापनांची डिजिटल नोंदवही ठेवण्याचा नमुना व तपशील विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

खंड ३९(७). या खंडान्वये, अपील दाखल करण्याची रीत विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

खंड ४०(७). या खंडान्वये, अपील दाखल करण्याची रीत विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

खंड ४६. या खंडान्वये, परिषदेचे लेखे ठेवण्याची व लेखापरीक्षा करण्याची रीत विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

खंड ४८. या खंडान्वये, राज्य परिषदेकडे विवरणे सादर करण्याची रीत विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

खंड ५१. या खंडान्वये, प्राधिकरणाच्या किंवा राज्य परिषदेच्या संनिरीक्षणाखालील रोगांचा किंवा आरोग्यविषयक घटनांचा अहवाल देण्याची रीत विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

खंड ५२(१). या खंडान्वये, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

खंड ५३(१). या खंडान्वये, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना उद्भवणारी कोणतीही अडचण दूर करण्यासाठी, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील अशा तरतुदी, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या आत, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

२. वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे वर नमूद केलेले प्रस्ताव सामान्य स्वरूपाचे आहेत.

(शा.म.मु.) एचबी ७५८–५ (१०४५—७-२०२६)

वित्तीय ज्ञापन

या विधेयकाच्या खंड ३(१) मध्ये, राज्यामध्ये महाराष्ट्र राज्य चिकित्सा आस्थापना परिषद घटित करण्याची तरतूद केली आहे. उक्त परिषदेमध्ये एक अध्यक्ष व सदस्य यांचा समावेश असेल आणि परिषदेचे कामकाज चालवण्यासाठी आवश्यक असतील असे अधिकारी व कर्मचारी देखील पुरविण्यात येतील. अध्यक्ष व सदस्यांना प्रदेय असलेले मानधन व भत्ते आणि कर्मचाऱ्यांना प्रदेय असलेले वेतन व भत्ते, इत्यादी आणि इतर प्रशासकीय खर्च, शासनाने, याबाबतीत यथोचितरीत्या केलेल्या विनियोजनाद्वारे परिषदेला दिलेल्या अनुदानातून प्रदान करण्यात येतील. या विधेयकात, राज्याच्या एकत्रित निधीतून करावयाच्या रुपये पाच कोटी इतक्या चालू अंदाजित अनावर्ती खर्चाचा अंतर्भाव असेल आणि आवर्ती खर्च अंदाजित केलेला नाही.

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ अन्वये राज्यपालांची शिफारस

(महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग, आदेशाची प्रत)

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ याच्या खंड (३) अन्वये महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून, ते महाराष्ट्र चिकित्सा आस्थापना (नोंदणी व विनियमन) विधेयक, २०२६ विचारात घेण्याबाबत राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांना शिफारस करीत आहेत.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

[सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५१.]

[महाराष्ट्र राज्यातील चिकित्सा आस्थापनांची नोंदणी, विनियमन व तपासणी करण्यासाठी, अशा आस्थापनांद्वारे ज्या सुविधा व सेवा पुरविण्यात येतील त्यांची किमान मानके विहित करण्याकरिता; आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्यासाठी विधेयक.]

[श्री. प्रकाश आबिटकर,

सार्वजनिक आरोग्य मंत्री.]

जितेंद्र भोळे,

सचिव-१,

महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.